| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं. ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

प्रेसनोट क्रमांक :- ३४३ दिनांक :- १०/१२/२०२१

## इलेक्ट्रॉनिक वेअर हाऊसमध्ये लॅपटॉप चोरी करणाऱ्या सराईत टोळीस अटक करुन ३१,७७,६०० रु किंमतीचे लॅपटॉप जप्त- गुन्हे शाखा- २ वसई युनीट यांची कामगिरी

वसई पुर्व येथील कपंनीचे वेअर हाऊसचे मागील शटर कशानेतरी तोडून त्यावाटे आत प्रवेश करुन लिनोव्हा कंपनीचे एकुण रु.३१,७७,६००/-किमतीचे ९६ लॅपटॉप फिर्यादी यांची घरफोडी करुन चोरुन नेल्याबाबत सुनिल शामलाल पंसारी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन वालीव पोलीस ठाण्यात दि. ६/१२/२०२१ रोजी गु. र. नं. १३८७/२०२१ भा.दं.वि.स.कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा- २ वसई युनीट मधील अधिकारी व अमंलदार यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयात वापरण्यात आलेले वाहन निष्पण केले. तशाच प्रकारच्या वाहनाची माहिती घेत असताना नागले परीसरात तसे वाहन फिरत असल्याची बातमीदार यांचेकडुन माहिती प्राप्त झाल्याने नमुद वाहन ताब्यात घेता वाहनाचे नंबर प्लेटवर चिखल लावल्याचे दिसुन आले. नमुद वाहन चालकास विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने सदरची गाडी ही इसम नामे रविंद्र धनुष्यधारी उपाध्याय रा. पाटीदार गोल्ड बिल्डींग, मालोडी व्हीलेज, खारबाव स्टेशन, ता. भिवंडी हा दिनांक ५/१२/२०२१ रोजी रात्रौ कामाकरीता नमुद वाहन घेवुन गेल्याची माहिती प्राप्त झाली. त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी करता त्याने गुन्हयाची कबुली दिली व त्याचा एक साथीदार नामे २) विकासकुमार रामआश्रय यादव, रा. पाटीदार गोल्ड बिल्डींग, मालोडी व्हीलेज, खारबाव स्टेशन, ता. भिवंडी हा त्याचे मुळ गावी उत्तरप्रदेश येथे रेल्वेने पळुन गेल्याची माहिती प्राप्त झाली तेव्हा त्याबाबत लोहमार्ग पोलीस यांची मदत घेवुन त्यास भुसावळ येथे ताब्यात घेण्यात आले. तसेच त्याचे अन्य दोन साथीदार ३) नितिन त्रिवेणी मौर्या, रा. माणकोली गाव, माणकोली बेलारोड, ता. भिवंडी, ४) अजय आनंदा सावंत रा. भिवंडी यांना भिवंडी येथुन दि.९/१२/२०२१ रोजी ताब्यात घेतले आहे. रविंद्र धनुष्यधारी उपाध्याय व त्याचे साथीदार यांनी चोरी केलेला मुददेमाल ३१,७७,६००/-किंमतीचे ९६ लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. तसेच गुन्हा करण्याकरता वापरण्यात आलेली वाहने १) टाटा झेनॉन पिकअप गाडी क्रमांक एम एच/१२/जेएफ/४३६७ २) होंडा कंपनीची युनीकॉन मोटार सायकल क्रमांक एम एच ४८ एक्स ४७९० ३) नंबर प्लेट नसलेली ॲक्टीवा ४) होन्डा कंपनीची वेरना कार नं. एम एच ०४ जी जे ६१२ ही सुध्दा जप्त करण्यात आली असुन सदर गुन्हयात एकुण

४०,५५,६१६/- रु किं चा मुद्देमाल जप्तकरण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचे चौकशी दरम्यान आरोपीत नामे १) रविंद्र धनुष्यधारी उपाध्याय २) विकासकुमार रामआश्रय यादव ३) अजित खैरवाल, रा. गाजीपुर, उत्तरप्रदेश पुर्ण नाव पत्ता माहिती नाही यांनी वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८८२/२०२१ भा.द.वि.सं.क ३७९ प्रमाणे हा गुन्हा देखील केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच सदर गुन्हा करण्याकरता रविंद्र धनुष्यधारी उपाध्याय याने त्याची हुंडाई कंपनीची वेरना कार नं. एम एच ०४ जी जे ६१२ हीचा वापर केल्याने ती सुध्दा जप्त करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा- २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि. रणजीतसिंग परदेशी, पो.हवा. मंगेश चव्हाण, संजय नवले, रमेश भोसले, महेश पागधरे, चंदन मोरे, पो.ना./ प्रशांत पाटील, प्रशांत ठाकुर, जगदीश गोवारी, पो.कॉ. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांनी केली आहे.

--------------ooo--------------